


छाया: कांती ठक्कर

अशोककुमारचा चिरतरुण म्हातारा

अछूत कन्यापासून हिंदी चित्रपटात नायक म्हणून पदार्पण करणाऱ्या अशोककुमारने काळाची पावलं ओळखून आपल्या भूमिकांतही बदल केला. म्हणूनच साठाव्या वर्षी त्याने अभिनय केलेला *व्हिक्टोरिया २०३* चित्रपटही तेवढाच लोकप्रिय ठरला.

☐ इसाक मुजावर

सोहराब मोदींचे *पुकार*, *शीशमहल* यासारखे काही जुने चित्रपट आजही टी.व्ही.च्या निरनिराळ्या वाहिन्यांवर पाहायला मिळतात. चाळीसच्या दशकातील अनेक अभिनेते त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर तरळतात. यापैकी कोणताही अभिनेता हिंदी चित्रपटात नायकाच्या चौकटीत बसणारा नव्हता. कारण चित्रपटातील त्यांचं स्थान चरित्र-अभिनेत्याचं होतं. पण आजच्या चित्रपटातील चरित्र-अभिनेत्याप्रमाणे त्यांचं स्थान मात्र ऑल्सो रॅनच्या वर्गवारीतील नव्हतं. संपूर्ण चित्रपट व्यापून टाकणारं होतं. यामुळे त्यांच्या चित्रपटात नायक-नायिकेचं स्थान अनेकदा दुय्यम ठरायचं. आणि चित्रपटाची संपूर्ण कथा त्यांच्या भोवतीच फिरत राहायची. पन्नासच्या दशकात दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद या त्रयींचा आपल्या चित्रपटात उदय झाला आणि त्यानंतर हे चित्र हळूहळू बदलायला लागलं.

दिलीप, राज, देव या त्रयींने आपल्या

चित्रपटातील चरित्र-अभिनेत्यावरच नव्हे तर तोवर आपल्या चित्रपटात लोकप्रिय असलेल्या अनेक नायकांवरदेखील मात दिली. एक नायक मात्र त्याला अपवाद ठरला आणि तो पन्नासच्या दशकातही दिलीप, राज, देव यांच्या खांद्याला खांदा लावून यशस्वीपणे वाटचाल करीतच राहिला.

हे यश अशोककुमारला मिळालं. कारण दिलीप, राज, देव यांच्या आगमनानंतर बदलत चाललेला आपल्या चित्रपटातील नायकाचा चेहरा त्याने अचूकपणे हेरला. दिलीप, राज, देव यांनी पन्नासच्या दशकातील आपल्या चित्रपटातील नायकाला एक तरुणाई दिली होती. त्यांच्या नायकाची ही तरुणाई चाळीसच्या दशकातील नायकाला पकडता येण्यासारखी नव्हती. प्रौढत्वाकडे झुकलेल्या आपल्या वयाचा विचार न करता तरुण नायक साकार करण्याचा प्रयत्नात त्यांचा नायक एकदम केविलवाणा बनून जात होता.

अशोककुमारचा नायक मात्र असा केविलवाणा कधीच झाला नाही. कारण दिलीप, राज, देव यांच्या उदयानंतर नायिकेमागे रोमँटिक गाणी गात धावणारा नायक साकार करण्याचा प्रयत्न केला तर आपलं हसू होईल ही गोष्ट त्याने अचूकपणे ओळखली. १९५०च्या *संग्राम* या चित्रपटात हाती पिस्तुल घेऊन दिलीप, राज, देव या तिघांच्या नायकाच्या चौकटीत कोठेही बसणार नाही, असा आपला वेगळा नकारात्मक नायक आपल्या चित्रपटात त्याने निर्माण केला. या नकारात्मक नायकाच्या भूमिकेत त्यानंतर जवळजवळ दहा वर्षे नायक म्हणून तो आपल्या चित्रपटात ठामपणे उभा राहिला. *सरदार, शतरंज, अफसाना, एक साल, शेरू, तलाश, उस्ताद, शमशीर* यासारख्या अनेक चित्रपटातील त्याची नकारात्मक नायकाची भूमिका या काळात गाजली आणि त्याच्या या भूमिकानींच नकारात्मक नायकाचा चेहरा आपल्या चित्रपटात ग्लोरिफाईड करून त्यानंतरच्या काळातील अनेक नायकांच्या यशाचा पाया येथे घातला.

दिलीप, राज, देव यांच्या उदयानंतर अशोककुमारच्या नायकाची तरुणाई संपली होती. तरीही नकारात्मक नायकाने त्याचे तरुणपण मात्र त्यानंतरच्या काळातही टिकवलं होतं. यामुळे पन्नासीपर्यंत तो येथे तरुण नायकाची भूमिका करीत राहिला. १९६२चा *हाँगकाँग* त्याची तरुण नायकाची भूमिका असलेला शेवटचा चित्रपट. त्याला मुलीसमान असलेली बी. सरोजादेवी या चित्रपटात त्याची नायिका होती. अशोककुमार तिच्याबरोबर नायकाची भूमिका करत होता. तेव्हा लीला चिटणीस, वीणा या एका जमान्यातील त्याच्या नायिका चरित्र-अभिनेत्री बनून त्याच्या अनेक नायिकांच्या आईची भूमिका करू लागल्या होत्या. त्याच्या या नायिकांपैकी माला सिन्हाची एक गंमतीदार आठवण येथे मुद्दाम सांगण्यासारखी आहे. माला सिन्हाचे वडील अल्बर्ट सिन्हा वयाने त्याच्याहून दोन वर्षांनी लहान होते. तरी तो त्यांच्या मुलीचा - माला सिन्हाचा नायक बनला.

१९६२ ला अशोककुमार तरुण नायक म्हणून संपला. तरुण नायक म्हणून आपण आता संपत आलोय ही गोष्ट त्याआधीच त्याच्या लक्षात आली होती आणि नायकाचा आपला चेहरा पुसून चरित्र भूमिकेकडे आपला मोर्चा वळवण्याचा प्रयत्न १९५९च्या *बेदर्द जमाना क्या जाने, नाचघर, नई राहे* या चित्रपटापासून त्याने चालवला होता. त्याला यश मिळवून देणारा पहिला चित्रपट म्हणजे १९६०चा बी. आर. चोप्रांचा *कानून*. आपल्या डोक्यावरील सर्व केस पांढरे करून या चित्रपटात त्याने एका न्यायाधीशाची भूमिका केली होती.



*बर्मा रोड*मध्ये विजया चौधरीसमवेत खलनायकाच्या अविस्मरणीय भूमिकेत



*शौकिन*मध्ये रती अग्निहोत्रीसमवेत



*आकाशदीप*मध्ये नंदा आणि निम्मीसमवेत

नंदा या चित्रपटात त्याची मुलगी बनली होती. चरित्र अभिनेता म्हणून त्याच्या रुपेरी जीवनाचं दुसरं पर्व त्याच्या या भूमिकेपासूनच सुरू झालं.

या नव्या युगात अशोककुमारची चरित्र भूमिका चित्रपटातील एक मध्यवर्ती भूमिका बनली आणि त्याच्या या मध्यवर्ती चरित्र भूमिकेत राजेंद्रकुमार (*कानून, मेरे मेहबूब*), सुनील दत्त (*आज और कल, गुमराह, मेहरबान, भाई बहन*), धर्मेंद्र (*चांद और सूरज, पूजा के फूल, आकाशदीप*), शशी कपूर (*बेनजीर*), मनोजकुमार (*नकली नबाब, गृहस्थी, फुलो की सेज*), जॉय मुखर्जी (*बहू बेटी, दिल और मुहब्बत*), राजकुमार (*उंचे लोग, नई रोशनी*), जितेंद्र (*दो भाई, माँ और ममता*), विश्वजित (*प्यार का सपना, पैसा या प्यार*), नवीन निश्चल (*व्हिक्टोरिया नंबर २०३*), विनोद मेहरा (*अनुराग*) यासारखे अनेक नायक त्याच्यासमोर एकदम दुय्यम स्थानावर येऊन बसले.

नायकावरही मात करणारे हे स्थान अशोककुमारने चरित्र भूमिकात मिळवलं याचं कारण तेव्हाही काहीतरी वेगळं करण्याची त्याची जिद्द संपली नव्हती. १९७२च्या *व्हिक्टोरिया नं. २०३* या चित्रपटातील त्याच्या भूमिकेची पण आठवण या दृष्टीने येथे मुद्दाम सांगण्यासारखी आहे. ही भूमिका त्याने स्वीकारली तेव्हा त्याने वयाची साठी पार केली होती. त्याची मुलगी भारती तेव्हा पुण्याच्या फिल्म इस्टिट्यूटमध्ये अभिनयाचे शिक्षण घेत होती. तिला भेटायला तो एकदा इन्स्टिट्यूटमध्ये गेला होता. तेथे इम्प्रोव्हायझेशनचा एक अभ्यासक्रम त्याने पाहिला. या अभ्यासक्रमात इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांना एखादा सीन दिला जातो. पण त्या सीनचे संवाद मात्र दिले जात नाहीत. सीन हाती पडल्यावर विद्यार्थ्यांनी तो सीन आधी समजावून घ्यायचा असतो आणि त्या सीननुसार संवाद स्वतः तयार करून ते बोलायचे असतात.

अशोककुमारने हे पाहिलं मात्र. तो उत्स्फूर्तपणे उद्गारला, 'धीस इज न्यू फॉर मी.'

एवढ्यावरच तो थांबला नाही. इन्स्टिट्यूट-मधील इम्प्रोव्हायझेशनच्या अभ्यासक्रमाचा प्रयोग आपल्या एखाद्या भूमिकेत करायचा, असं ठरवूनच तो पुण्याहून मुंबईला आला. *व्हिक्टोरिया नं. २०३* हा चित्रपट तेव्हाच त्याला ऑफर झाला. तो स्वीकारताना या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक ब्रिज यांना त्याने सांगितलं, ''पुण्याच्या इन्स्टिट्यूटमध्ये इम्प्रोव्हायझेशनचा नवा प्रकार मी पाहिला आहे. त्याचा प्रयोग या चित्रपटात मला करायचाय. यासाठी या चित्रपटातील माझे व प्राणचे संवाद तू आमच्या हाती देऊ नकोस. फक्त सीन दे. त्या सीनमध्ये संवाद काय बोलायचे हे मी व प्राण मिळून ठरवतो. आणि त्याप्रमाणे आमचे संवाद आम्ही बोलतो.''

ब्रिजनी अशोककुमार व प्राण या दोघांना हे स्वातंत्र्य दिलं आणि त्यानंतर आपले संवाद स्वतः तयार करून त्या दोघांनी *व्हिक्टोरिया नं. २०३* या चित्रपटातील केवळ आपल्या भूमिकेतच नव्हे तर या चित्रपटातदेखील एक वेगळा रंग भरला. राज कपूरदेखील तेव्हा या चित्रपटातील त्या दोघांची भूमिका पाहून प्रभावित झाला होता. आणि या वयात अशीच भूमिका आपल्यासाठी लिहिली गेली तर ती करायला आपल्याला आवडेल असं बोलून गेला होता.



बी.आर.चोप्राच्या *तवायफ*मध्ये ऋषी कपूरबरोबर चरित्र भूमिकेत



अशोककुमार-प्राणः धमाल जोडी

अनेक नायकांना न जमलेली ही किमया अशोककुमारला जमली हे त्याचं सर्वात मोठं यश. हे यश त्याला उगाचच मिळालं नाही. चरित्र भूमिकातही अनेक रंग भरून विविधता आणायचा प्रयत्न त्याने केला. यामुळे *व्हिक्टोरिया नं. २०३* मधील त्याची भूमिका *कानून, मेहरबान*मधील त्याच्या भूमिकेहून एकदम वेगळी वाटते. प्रत्येक भूमिकेत काहीतरी वेगळं करायचा प्रयत्न त्याने सातत्याने केल्यामुळे *कानून*पासून सुरू झालेल्या त्याच्या चरित्र-अभिनेत्याच्या वाटचालीतील *अनुराग, आसू बन गये फूल, दो फूल, गृहस्थी, पैसा या प्यार, दो आँखे, आशीर्वाद, अर्जुन पंडित, एक से बढकर एक, धर्मा, चोर के घर चोर, खट्टा मिठा, शौकीन* या चित्रपटातील त्याच्या भूमिका अशा काही रंगल्या की त्या कोणाला कधी विसरता येणार नाहीत. यापैकी *कानून*मधील त्याच्या न्यायाधीशाच्या भूमिकेला न्यायमूर्ती छगलांनी देखील दाद दिली होती.

अशोककुमारने त्याच्याशिवाय अन्य कोणाही अभिनेत्याची कल्पना करता येऊ नये असं अनन्यसाधारण स्थान चरित्र भूमिकात मिळवलं. यामुळे त्याने चरित्र भूमिकांना ऑल्सो रॅनच्या वर्गवारीतून बाहेर तर काढलंच आणि पारितोषिकाप्रत पोहोचला. *आशीर्वाद* या चित्रपटातील भूमिकेसाठी त्याला १९७० साली सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचं फिल्मफेअर व राष्ट्रीय पारितोषिक मिळालं होतं. त्याच्यानंतर संजीवकुमार (*आंधी, अर्जुन पंडित*), अनुपम खेर (*सारांश*) यासारख्या काही अभिनेत्यांच्या चरित्र भूमिकांनी सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचं पारितोषिक पटकावलं. पण याची सुरुवात अशोककुमारच्या चरित्र भूमिकांनीच केली. नव्वदी पार केलेला अशोककुमार आता पडद्यावर दिसत नसला तरी त्याचं हे ऋण कोणाला विसरता येणार नाही. ●